# Project Guidelines & List of Subjects for B.Sc. (Agriculture/Horticulture)

## पदवी प्रकल्पासाठी मार्गदर्शक तज्ज्ञाची निवड

1. आपण कृषिविज्ञान पदवी अथवा उद्यानविद्या पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर आपण निवडलेल्या विषयावर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी संबंधित तज्ज्ञता क्षेत्रामधील मार्गदर्शक तज्ज्ञाची निवड करावी.
2. आपण निवडलेला मार्गदर्शक तज्ज्ञ अथवा शिक्षक हा कृषि विज्ञानक्षेत्रातील कोणत्याही विषयातील/विद्याशाखेतील आणि **आपण निवडलेल्या विषयातील तज्ज्ञ आणि किमान पदव्युत्तर पदवीधारक (Post Graduate in Agricultural Sciences) असावा. सदर तज्ज्ञास कृषि शिक्षण, संशोधन आणि कृषि विस्तार कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव असावा.**
3. आपण निवडलेले मार्गदर्शक तज्ज्ञ शिक्षक हे कृषि महाविद्यालयात अथवा कृषि विद्यापीठामध्ये **किमान सहायक प्राध्यापक (Assistant Professor) आणि त्यावरील पदावर कार्यरत असावेत.** कृषि विज्ञान केंद्रात **किमान विषय विशेषज्ञ (Subject Matter Specialist) आणि त्यावरील पदावर कार्यरत असावेत** अथवा कोणत्याही कृषि शिक्षण व संशोधन आस्थापनांवर समकक्ष पदांवर कार्यरत अथवा निवृत्त असावेत.
4. उपरोक्त अ.क्र. 2 व 3 मध्मे दिलेली **शैक्षणिक पात्रता आणि कार्मानुभव असलेल्मा तज्ज्ञांना मुक्त विद्यापीठामार्फत कोणतीही लेखी मान्मता घेण्माची आवश्मकता नाही. मात्र एका मार्गदर्शक तज्ञास एका शैक्षणिक वर्षामध्ये कमाल 5 विद्यार्थ्यांच्या पदवी प्रकल्पासाठी मार्गदर्शक तज्ञ म्हणून काम करता येईल.**
5. कृषि विज्ञान विद्याशाखेमध्ये कृषि विज्ञान (Agriculture), उद्यान विज्ञान (Horticulture), पशु विज्ञान (Animal Husbandry), दुग्धशास्त्र (Dairy Sciences), पशुवैद्यकीयशास्त्र (Veterinary Sciences), वनशास्त्र (Forestry), मत्स्य विज्ञान (Fisheries), कृषि जैवतंत्रज्ञान (Agro Bio-Technology), कृषि अभियांत्रिकी (Agricultural Engineering), गृहविज्ञान (Home Sciences) आणि तत्सम कृषि आधारीत (Allied and Applied Agricultural Sciences) शाखांचा समावेश होतो.

### *कृषि विज्ञान पदवी/उद्यानविद्या पदवी प्रकल्प तयार करून सादर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना*

01. **विद्यार्थ्यांनी आपला प्रकल्प अहवाल परिपूर्ण स्वरूपात त्यावरील प्रपत्रासह दिलेल्या मुदतीमध्ये आपल्या नोंदणीकृत कृषि शिक्षण केंद्रावर सादर करावा आणि तशी पोहच पावती घ्यावी.**
02. **कृषि शिक्षण केंद्रांनी मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व प्रकल्प अहवालांची कृषि विज्ञान आणि उद्यानविद्या अशा दोन याद्या करून दोन स्वतंत्र बंडल दिलेल्या मुदतीमध्ये विद्यापीठाच्या परीक्षा विभाग युनिट – 3 मध्ये सादर करावीत.**
03. माहितीपुस्तिकेमध्ये दिलेल्या मुदतीनंतर कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रकल्प अहवाल कोणत्याही केंद्रावर सादर करून घेण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी, आणि **कोणत्याही विद्यार्थ्याने मुदतीमध्ये अथवा मुदतीनंतर कोणताही प्रकल्प अहवाल विद्यापीठात डायरेक्ट पाठवू नये, पाठविल्यास अशा अहवालाची नोंद घेण्यात येणार नाही.**

### ✹ पदवी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रशासकीय सूचना

01. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कृषिविज्ञान पदवी व उद्यानविद्या पदवी हे दोन्ही पदवी शिक्षणक्रम प्रत्येकी 160 श्रेयांकांचे असून त्यांपैकी आपण 128 श्रेयांकाचे कृषिविज्ञान पदवीसाठी आवश्यक उद्यानविद्या पदविका, कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका आणि कृषि पत्रकारिता पदविका हे तीन पदविका शिक्षणक्रम पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे. तर उद्यानविद्या पदवी शिक्षणक्रमासाठी आवश्यक फळबागा पदविका, भाजीपाला पदविका आणि फुलशेती व प्रांगण उद्यान हे तीन पदविका शिक्षणक्रम पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे.
02. पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर पदवी प्रकल्प तयार करण्यासाठी उद्‌बोधनाबाबत केंद्रामार्फत किमान तीन संपर्कसत्रे घेतली जातात. वरील तीनही संपर्कसत्रास विद्यार्थ्याने उपस्थित राहणे बंधनकारक आहे. या सर्व संपर्कसत्राच्या कालावधीत आपण केंद्रप्रमुख / संयोजक , समंत्रक यांचेशी चर्चा करून पदवी प्रकल्प अहवाल तयार करण्याविषयी, विषय व मार्गदर्शक तज्ञ निवडीविषयी, परीक्षा पध्दती, प्रकल्प मुल्यमापनविषयी चर्चा करून शंकासमाधान करून घ्यावे.
03. आपणास कृषिविज्ञान पदवी [B.Sc. (Agriculture)] हवी असल्यास माहिती पुस्तिकेतील कृषिविज्ञान पदवी प्रकल्प सूचीमधील कोणताही एक विषय निवडून त्यावर आधारित प्रकल्प अहवाल तयार करून सादर करणे आवश्यक आहे.

आपणास उद्यानविद्या पदवी [B.Sc. (Horticulture)] हवी असल्यास माहिती पुस्तिकेतील उद्यानविद्या पदवी प्रकल्प विषयसूचीतील कोणताही एक विषय घेऊन त्यावर आधारीत प्रकल्प अहवाल तयार करून सादर करणे आवश्यक आहे. एखाद्या विद्यार्थ्याला विषयसुची मध्ये दिलेल्या विषयाशिवाय इतर नाविण्यपूर्ण अथवा कालानुरूप अथवा यथोचित विषयावर प्रकल्प अहवाल तयार करावयाचा असल्यास अशा विद्यार्थ्यांनी मार्गदर्शक प्राध्यापकांसमवेत चर्चा करून प्रकल्प अहवालाचे घटक व उपघटकांची नावे निश्चित करून प्रकल्प अहवाल तयार करावा.

04. प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांने निवडलेल्या विषयावर सखोल वाचन, मनन आणि वेगवेगळ्या ठिकाणी उदाहरणार्थ, कृषि.–विद्यापीठातील ग्रंथालये, कृषि आणि फलोद्यान खाते, बागायतदार संघ, प्रगतिशील शेतकऱ्यांशी चर्चा आणि आपण निवडलेल्या विषयाशी संबंधित संस्थांना आणि ठिकाणांना भेटी देऊन त्या ठिकाणाहून निवडलेल्या प्रकल्पाबाबत नमुना आराखड्यामध्ये दिलेल्या मुद्यावर माहिती संकलित करावी.

05. आपण प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निवडलेल्या विषयाबाबतचे संदर्भ ग्रंथ, पुस्तके, पुस्तिका, मासिके, घडीपत्रिका, शासकीय संस्था, सेवाभावी संस्थांचे अहवाल आणि इंटरनेटवरून डाऊनलोड केलेली माहिती संकलित करून प्रकल्प अहवाल लिहिण्यासाठी आपल्या मार्गदर्शक प्राध्यापकांना दाखवून प्रमाणित करून घ्यावी.

06. **आपण उपरोक्त संकलित केलेल्या माहितीच्या स्त्रोतांचा उपयोग करून स्वत: संबंधित माहितीची टाचणे/नोटस फुलस्केप नोंदवहीमध्ये स्वत:च्या भाषेत आणि स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून काढावीत आणि त्याचा उपयोग प्रकल्प अहवालाचे हस्तलिखित तयार करण्यासाठी करावा. संदर्भ स्त्रोतातील माहितीची जशीच्या तशी अथवा किरकोळ फेरफार करून नक्कल (कॉपी) करू नये.** आपण निवडलेल्या तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून संपूर्ण प्रकल्पाच्या कालावधीत किमान 6 ते 10 वेळा आवश्यकतेप्रमाणे मार्गदर्शन मिळवावे. यासाठी आपण वेळोवेळी आपल्या तज्ज्ञ मार्गदर्शकाच्या संपर्कात राहावे.

07. **आपला पदवी प्रकल्प अहवाल मूल्यमापन करताना खालीलपैकी कोणत्याही एक अथवा अधिक कारणांमुळे नाकारला जाईल याची अहवाल सादर करतानाच नोंद घ्यावी.**
    1. **जुनी आणि कालबाह्य माहिती आणि डेटा प्रकल्प अहवालात समाविष्ट केल्यास.**
    2. **शुद्ध लेखनाच्या असंख्य चुका असल्यास आणि दिलेली माहिती सुसंगत व तर्कशुद्ध नसल्यास.**
    3. **प्रकल्प अहवालातील आलेख आणि छायाचित्रे खराब, अस्पष्ट आणि अयोग्य ठिकाणी दिल्यास.**
    4. **प्रकल्प अहवाल लेखनासाठी शिफारस केलेला फॉन्ट, आराखडा, आकृतिबंध व प्रमाणपत्रे विद्यापीठाने दिलेल्या नमुन्याप्रमाणे नसल्यास.**
    5. **प्रकल्प अहवालात कमी अधिक प्रमाणात माहितीची नक्कल अथवा उताऱ्याची आदलाबदल केल्याचे आढळून आल्यास.**

08. **तोंडी परीक्षेच्या वेळी पुढील कागदपत्रे सोबत आणल्याशिवाय आपली तोंडी परीक्षा घेण्यात येणार नाहीः 1. आपले ओळखपत्र, 2. पदवी प्रवेश परीक्षा (CET) गुणपत्रक, 3. आपण संकलित केलेली पुस्तके, मासिके, इंटरनेट प्रिंट, 4. आपली पदवी प्रकल्प हस्तलिखिताची प्रत,** 5. **मार्गदर्शक तज्ज्ञांनी तपासून लेखी सूचना केलेली टंकलिखित प्रत.** तोंडी परीक्षेच्या वेळी आपणांस तज्ज्ञांमार्फत तपासलेला स्पायरल प्रकल्प अहवाल व प्रकल्पातील दुरूस्त करावयाच्या त्रुटींचा अहवाल प्रदान करण्यात येईल.

09. पदवी प्रकल्प अहवाल सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन साधारणपणे एप्रिल महिन्यात प्रकल्प मूल्यमापन तज्ज्ञामार्फत केवळ नाशिक येथे करण्यात येईल. प्रकल्प अहवाल यशस्वीरित्या तोंडी व लेखी परीक्षा स्वतंत्रपणे किमान 50% गुण मिळवून पूर्ण केल्यानंतरच कृषिविज्ञान अथवा उद्यानविद्या पदवी शिक्षणक्रमाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

10. कृषिविज्ञान/उद्यानविद्या पदवी प्रकल्प अहवाल विद्यापीठाला सादर करताना दिलेल्या सूचनांनुसार एक प्रत स्पायरल बाइंडिंग करून विद्यापीठाला सादर करावी. मात्र प्रकल्पावर आधारित तोंडी परीक्षा पूर्ण झाल्यानंतर आणि तोंडी परीक्षेच्या वेळी विद्यापीठाकडून दिलेल्या सूचनांचा अंतर्भाव करून **अंतिम प्रकल्प अहवाल दोन प्रतींमध्ये पक्का बाईंडिंग करून सोबत आपला तपासणी केलेला स्पायरल प्रकल्प अहवाल आणावा. प्रकल्प अहवाल .pdf format file, Word format file, .jpeg format file (बाईंडिंग केल्यानंतर जसा असतो तसा पीडीएफ, ओपन वर्ड फाईल फोटों, आकृत्यांसह) दोन प्रतींमध्ये सीडीसह मुक्त विद्यापीठास सादर करावा.**

11. एखाद्या विद्यार्थ्याने पदवी प्रकल्प अहवाल आणि तोंडी परिक्षा (Viva-voce Examination) यशस्वीरित्या पूर्ण केली असल्यास अशा विद्यार्थ्याने 1 ते 30 जून पर्यंत अंतीम प्रकल्प अहवाल चार प्रतीत सादर करावा. **30 जून नंतर पदवी प्रकल्प अहवाल सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.300 + एका दिवसाला रु.10 याप्रमाणे पदवी प्रकल्प विलंब शुल्क म्हणून विद्यापीठात भरावे लागेल.**

## ✸ पदवी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सूचना

01. **प्रकल्प अहवाल 100 पानांपेक्षा कमी आणि 150 पानांपेक्षा जास्त असता कामा नये.** असल्यास असा प्रकल्प अहवाल तपासला जाणार नाही. तसेच आपल्या प्रकल्प अहवाल विषयास अनुसरून विद्यापीठाने विहित केलेल्या आराखड्यानुसारच तयार करावा.

02. पदवी प्रकल्प अहवालातील सर्व प्रमाणपत्रे विद्यापीठाने दिलेल्या फॉरमॅटनुसारच देण्यात यावीत. पदवी प्रकल्प अहवाल तयार करताना मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही प्रकारच्या लेखनासाठी पुढीलपैकी कोणताही एक 12 पॉइंट युनिकोड फॉँट (Arial Unicode MS OR DVOT-Surekh OR DVOT-Yogesh) निवडावा व 1.5 लाईन स्पेस ठेवावी.

03. पदवी प्रकल्प अहवाल टंकलिखित करतांना साधारणपणे एका पानावर 3–4 पॅराग्राफ असावेत. प्रकल्प अहवाल टंकलिखीत करताना (बाइंडिंग केल्यानंतर) कागदाच्या चारही बाजूंनी किमान एक–एक इंच जागा शिल्लक राहील अशा प्रकारे टंकलिखित करावा. प्रकल्प अहवालातील सर्व पानांवर अनावश्यक जागा सोडू नये. सर्व पानांवर पान क्रमांक पानावर खालच्या बाजूस मध्यभागी इंग्रजीमध्ये नमूद करावा. मजकुराच्या दोन्ही बाजू एका लाईनमध्ये अलाईन करून घ्याव्यात. अहवालाच्या सलग मजकुरामधील दोन ओळींमध्ये दीड स्पेस आणि दोन पॅराग्राफ मध्ये दोन स्पेस ठेवावी.

04. पदवी प्रकल्प अहवालात फोटोंच्या पानांची संख्या जास्तीत जास्त 20 पानांपर्यंतच (एकुण प्रकल्पाच्या पानांच्या 20% एवढी) असावी. प्रकल्प अहवालामधील सर्व फोटोग्राफ हे 4 X 6 इंच साईज आणि रंगीत असावेत आणि ते पांढऱ्या शुभ्र आर्ट पेपरवर आडवे चिकटवावेत. एका पानावर केवळ दोन आडवे फोटो द्यावेत. फोटोच्या खालच्या बाजूला फोटोक्रमांकासह माहिती लिहावी. साधारणपणे 25–30 फोटोग्राफ्स लावावेत. पिकाच्या जाती, किडी, रोग, तणे, प्रक्रिया,अभिवृध्दी/बीज प्रक्रिया पध्दती, पाणीपध्दती या सर्वच उपघटकात प्रत्येकी किमान 4–5 फोटो लावणे आवश्यक आहे.

05. पदवी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी A-4 साईज इक्झिक्युटिव्ह बॉंड पेपर वापरावा. मुखपृष्ठासाठी हिरव्या रंगाचा कागद वापरावा आणि त्यावर 5 X 7 इंच आकाराचा विषयानुरूप रंगीत फोटो आडवा चिकटवावा. प्रकल्प अहवालातील दोन घटकांमधील सेपरेटर कागद हा निळ्या रंगाचा वापरावा आणि त्या कागदावर कागदाच्या खालच्या भागात खालून 2 इंच जागा सोडून घटकाचे नाव एकाच ओळीत लिहावे.

06. पदवी प्रकल्प अहवालातील प्रकल्पाचे 8–10 उद्देश एकाखाली एक याप्रमाणे द्यावेत. त्यांना क्रमांक द्यावेत. उद्देश पॅरेग्राफ पद्धतीने लिहू नयेत. प्रकल्पाचा सारांश देताना संपूर्ण प्रकल्प अहवाल स्कॅन व्हावा. केवळ प्रस्तावना परत लिहू नये. अहवालामध्ये क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता यांची जिल्हानिहाय, राज्यनिहाय चालु वर्षातील विद्यमान आकडेवारीसह मागील पाच वर्षाची, आलेखांसह विश्लेषणात्मक माहिती नमूद करावी.

07. पदवी प्रकल्प अहवालात तापमान सेल्सिअसमध्ये, पाऊस मिलिमीटरमध्ये, अंतरे फुटांमध्ये, पाणी लिटरमध्ये, कीटकनाशकांचे प्रमाण 10 लीटर पाण्यासाठी, उत्पादन एकरी टनामध्ये अथवा क्विंटलमध्ये अथवा किलोमध्ये द्यावे. भारत सरकारने बंदी घातलेल्या कीटकनाशकांच्या शिफारशी देण्यात येऊ नयेत. उदाहरणार्थ, बी.एच.सी., डी.डी.टी., एन्डोसल्फॉन फॉस्फोमिडॉन, मोनोक्रोटोफॉस इत्यादी.

08. पदवी प्रकल्पातील विविध शास्त्रीय नावे (वनस्पती, जिवाणू, विषाणू, बुरशी इ.) इटालिक स्टाईलमध्ये नमुद करावीत.

09. पदवी प्रकल्प अहवालामध्ये केवळ उपलब्ध माहिती एकत्रित करून भरू नये तर उपलब्ध माहिती आणि प्रक्षेत्रावरील अनुभवांचे विश्लेषण करून आपल्या शब्दामध्ये लिहावे. मात्र शेतकऱ्यांचे अनुभव देताना केवळ भावनिक पातळीवर अतिरंजीत गोष्टी देऊ नयेत; तर त्यांना आकडेवारीचा अथवा हिशेब टिप्पणीचा आधार घ्यावा. पिकाच्या जातींमध्ये केवळ कृषि विद्यापीठांनी विकसित केलेल्या जाती न देता खाजगी बियाणे कंपन्यांच्याही जातींची माहिती द्यावी.

10. शेतकऱ्यांच्या यशोगाथा या घटकात किमान एक शेतकऱ्याची यशोगाथा, त्या शेतकऱ्याने वापरलेल्या तंत्रज्ञानाची, व्यवस्थापनाची, आर्थिक ताळेसंबंधाची आकडेवारीयुक्त विश्लेषणात्मक माहिती नमुद करणे आवश्यक आहे. यशोगाथेत शेतकऱ्यांचा फोटो, संपूर्ण नांव व पत्ता मोबाईल फोन ही माहिती प्रत्येक यशोगाथेच्या सुरूवातीच्या पानांच्या वरच्या उजव्या बाजूस फोटोखाली नमुद करावी.

11. संदर्भग्रंथांची सूची देताना लेखकाचे नाव, पुस्तकाचे नाव, प्रकाशन वर्ष, प्रकाशक, पान क्रमांक या पद्धतीने द्यावे. उदाहरणार्थ – भुजबळ भिमराज, पुष्पभारती, 1990, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान 10–18.

12. आपण संबंधित प्रकल्प अहवालाचे संपूर्ण हस्तलिखित प्रथम पानापासून (मुखपृष्ठापासून) शेवटच्या पानापर्यंत (संदर्भ ग्रंथसूचीपर्यंत) तयार करून संगणकावर प्रोसेस करून किमान दोन वेळा स्वत: तपासुन पुन्हा–पुन्हा दुरूस्त करून मार्गदर्शक तज्ज्ञास तपासणीसाठी द्यावे. **सदर हस्तलिखीत अथवा संगणक टंकलिखित प्रतीवर मार्गदर्शक तज्ज्ञ यांनी तपासून योग्य ठिकाणी लेखी स्वाक्षरीसह शेरा अथवा सूचना करणे बंधनकारक आहे.**

## ✹ पदवी प्रकल्प अहवाल (4 प्रतीत) विद्यापीठास सादर करण्यासाठी सूचना

**कृषि विज्ञान आणि उद्यानविद्या पदवीच्या विद्यार्थ्यांनी आपला प्रकल्प मूल्यमापन आणि तोंडी परीक्षेचा निकाल विद्यापीठाच्या वेबसाईटवर पाहावा आणि त्यानंतर पुढीलपैकी त्यांना लागू असलेली कार्यवाही करावी.**

1. आपण पदवी प्रकल्प अहवाल मूल्यमापन आणि तोंडी परीक्षेत **पास झाल्यास** आपण मूल्यमापन अहवालामध्ये सूचविलेल्या दुरूस्त्या करून आपला प्रकल्प अहवाल 4 प्रतीत .jpeg Format मधील फोटो सीडीसह 1 ते 30 जून या कालावधीमध्ये विद्यापीठात सादर करावा. **पदवी प्रकल्प अहवाल 30 जूननंतर सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.300 + दर दिवसाला रु.10 याप्रमाणे विलंब शुल्क भरावे लागेल.**
2. आपण पदवी प्रकल्प अहवाल मूल्यमापन आणि तोंडी परीक्षा या दोन्हीमध्ये **नापास झाल्यास** आपण पुढील वर्षी प्रकल्प अहवाल नव्याने तयार करून अथवा दुरूस्त करून दिलेल्या कालावधीमध्ये आपल्या कृषि शिक्षण केंद्रावर सादर करावा.
3. आपण पदवी प्रकल्प अहवाल मूल्यमापनामध्ये **पास झाल्यास** मात्र तोंडी परीक्षेत **नापास झाल्यास** आपण पुढील वर्षी पुनर्परीक्षार्थी अर्ज व शुल्क भरून केवळ तोंडी परीक्षेला उपस्थित राहावे.
4. आपण पदवी प्रकल्प मूल्यमापन अहवालात **नापास झाल्यास** मात्र तोंडी परीक्षेत **पास झाल्यास** आपण पुढील वर्षी पुनर्परीक्षार्थी अर्ज व शुल्क भरून आपला प्रकल्प अहवाल दिलेल्या कालावधीमध्ये आपल्या कृषि शिक्षण केंद्रावर सादर करावा. **आपणास तोंडी परीक्षेला पुन्हा उपस्थित राहणे आवश्यक नाही.**
5. **आपण पदवी प्रकल्प अहवालामध्ये कॉपी केल्याचे आढळून आल्यास आपणास शुन्य गुण देण्यात येतात. अशा वेळी विद्यमान प्रकल्प अहवाल आणि विद्यमान मार्गदर्शक तज्ज्ञ रद्दबातल करण्यात येतो. अशा वेळी आपण पुढील वर्षी नवीन विषय आणि नवीन मार्गदर्शक तज्ज्ञ निवडून नव्याने प्रकल्प अहवाल दिलेल्या मुदतीत पुनर्परीक्षा शुल्क भरून आपल्या कृषि शिक्षण केंद्रावर सादर करावा.**
6. वरील 1 ते 5 पैकी कोणतीही कार्यवाही करताना विद्यार्थाने सदर शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यापासून 3 वर्षे पूर्ण झालेली असल्यास अशा विद्यार्थ्यांनी वरील पैकी कोणतीही कार्यवाही न करता **पुढील वर्षी नव्याने पदवी प्रवेश परीक्षा पास करून नव्याने पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घ्यावा** आणि पदवी प्रकल्प अहवाल आपल्या कृषि शिक्षण केंद्रावर दिलेल्या कालावधीमध्ये सादर करावा. **आपला पदवी प्रकल्प अहवाल सादर करताना प्रकल्प अहवालाचा फॉन्ट, फॉरमॅट, अनुक्रमणिका, प्रमाणपत्रे, परिचयपत्रासाठी मुक्त विद्यापीठाच्या http://www.ycmou.ac.in OR http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटला भेट देऊन नवीन सूचनांचा अवलंब करावा.**

## ● पदवी प्रकल्प अहवालासाठी मराठी आणि इंग्रजी फॉन्ट चा नमुना

1. Arial Unicode MS – Font Size 14 Point

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची जुलै 1989 मध्ये स्थापना झाल्यानंतर विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ मार्च 1994 मध्ये होत आहे. ह्याचा अर्थ विद्यापीठ पाच वर्षाचे होण्यापूर्वीच त्याने काही शैक्षणिक कार्यक्रमांचे एक आवर्तन पूर्ण केले आहे, ही विद्यापीठाच्या दृष्टीने नव्हे तर महाराष्ट्र राज्याच्या दूरस्थ शिक्षणाच्या संदर्भातही विशेष नोंद होण्याजोगी घटना म्हटली पाहिजे. मुक्त विद्यापीठाचा प्रयोग राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशालाही नवा असताना तो रुजवण्यात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास यश येत असल्याचेच हा पदवीदान समारंभ एक गमक मानले पाहिजे. विशेष आनंदाची बाब म्हणजे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ स्वतःच्या भव्य वास्तूत आपला पाहिला पदवीदान समारंभ साजरा करीत आहे. ह्या सर्वच यशाबद्दल आपण विद्यापीठाचे कौतुक करू या. - *शरद पवार*

2. DVOT-Yogesh – Font Size 12 Point

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची जुलै 1989 मध्ये स्थापना झाल्यानंतर विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ मार्च 1994 मध्ये होत आहे. ह्याचा अर्थ विद्यापीठ पाच वर्षाचे होण्यापूर्वीच त्याने काही शैक्षणिक कार्यक्रमांचे एक आवर्तन पूर्ण केले आहे, ही विद्यापीठाच्या दृष्टीने नव्हे तर महाराष्ट्र राज्याच्या दूरस्थ शिक्षणाच्या संदर्भातही विशेष नोंद होण्याजोगी घटना म्हटली पाहिजे. मुक्त विद्यापीठाचा प्रयोग राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशालाही नवा असताना तो रुजवण्यात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास यश येत असल्याचेच हा पदवीदान समारंभ एक गमक मानले पाहिजे. विशेष आनंदाची बाब म्हणजे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ स्वतःच्या भव्य वास्तूत आपला पाहिला पदवीदान समारंभ साजरा करीत आहे. ह्या सर्वच यशाबद्दल आपण विद्यापीठाचे कौतुक करू या. - *शरद पवार*

3. DVOT-Surekh – Font Size 12 Point

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची जुलै 1989 मध्ये स्थापना झाल्यानंतर विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ मार्च 1994 मध्ये होत आहे. ह्याचा अर्थ विद्यापीठ पाच वर्षाचे होण्यापूर्वीच त्याने काही शैक्षणिक कार्यक्रमांचे एक आवर्तन पूर्ण केले आहे, ही विद्यापीठाच्या दृष्टीने नव्हे तर महाराष्ट्र राज्याच्या दूरस्थ शिक्षणाच्या संदर्भातही विशेष नोंद होण्याजोगी घटना म्हटली पाहिजे. मुक्त विद्यापीठाचा प्रयोग राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशालाही नवा असताना तो रुजवण्यात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास यश येत असल्याचेच हा पदवीदान समारंभ एक गमक मानले पाहिजे. विशेष आनंदाची बाब म्हणजे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ स्वतःच्या भव्य वास्तूत आपला पाहिला पदवीदान समारंभ साजरा करीत आहे. ह्या सर्वच यशाबद्दल आपण विद्यापीठाचे कौतुक करू या. - *शरद पवार*

# कृषि विज्ञान पदवी आणि उद्याविद्या पदवी प्रकल्प अहवाल विषय यादी:

## 1. कृषिविज्ञान पदवी प्रकल्प विषयसूची

**टिप:** विषयांची यादी ही परिपूर्ण नसून आपणास त्यामध्ये बदल करून हवा तो विषय निश्चित करता येईल अथवा नवीन विषय निवडता येईल. निवडलेल्या विषयास विद्यापीठाची मान्यता घेण्याची गरज नाही.

### 1.1 पिकवार विषय

01. ऊस–उत्पादन तंत्रज्ञान
02. कापूस–उत्पादन तंत्रज्ञान
03. गहू उत्पादन तंत्रज्ञान
04. भात उत्पादन तंत्रज्ञान
05. भूईमूग उत्पादन तंत्रज्ञान
06. तूर–उत्पादन तंत्रज्ञान
07. हरबरा–उत्पादन तंत्रज्ञान
08. मका–उत्पादन तंत्रज्ञान
09. ज्वारी–उत्पादन तंत्रज्ञान
10. बाजरी उत्पादन तंत्रज्ञान
11. सूर्यफूल उत्पादन तंत्रज्ञान
12. सोयाबिन उत्पादन तंत्रज्ञान
13. करडई उत्पादन तंत्रज्ञान
14. नागली उत्पादन तंत्रज्ञान
15. राजगिरा उत्पादन तंत्रज्ञान
16. मूग उत्पादन तंत्रज्ञान
17. उडीद उत्पादन तंत्रज्ञान
18. मटकी उत्पादन तंत्रज्ञान
19. हुलगा (कुलथी) उत्पादन तंत्रज्ञान
20. मसूर उत्पादन तंत्रज्ञान
21. चवळी उत्पादन तंत्रज्ञान
22. वाटाणा उत्पादन तंत्रज्ञान
23. घेवडा उत्पादन तंत्रज्ञान
24. मोहरी उत्पादन तंत्रज्ञान
25. तीळ उत्पादन तंत्रज्ञान
26. वरई उत्पादन तंत्रज्ञान
27. कारळा उत्पादन तंत्रज्ञान
28. राळा उत्पादन तंत्रज्ञान
29. बरसीम उत्पादन तंत्रज्ञान
30. स्टायलोहेमॅटा उत्पादन तंत्रज्ञान
31. शेवरी उत्पादन तंत्रज्ञान
32. अंजन ग्रास उत्पादन तंत्रज्ञान
33. पवना ग्रास उत्पादन तंत्रज्ञान
34. नेपीअर ग्रास उत्पादन तंत्रज्ञान
35. गिनीया ग्रास उत्पादन तंत्रज्ञान
36. एरंडी उत्पादन तंत्रज्ञान
37. ऑईल पाम उत्पादन तंत्रज्ञान
38. ताग उत्पादन तंत्रज्ञान
39. तुती उत्पादन व रेशीम उद्योग तंत्रज्ञान
40. घायपात उत्पादन तंत्रज्ञान
41. कोरफड उत्पादन तंत्रज्ञान
42. सुगंधी वनस्पती उत्पादन तंत्रज्ञान
43. व्हॅनिला उत्पादन तंत्रज्ञान
44. ॲनोटा उत्पादन तंत्रज्ञान
45. दवणा ग्रास उत्पादन तंत्रज्ञान
46. रोशा उत्पादन तंत्रज्ञान
47. सिट्रोनेला उत्पादन तंत्रज्ञान
48. लेमनग्रास उत्पादन तंत्रज्ञान
49. पचौली उत्पादन तंत्रज्ञान
50. जिरॅनिअम उत्पादन तंत्रज्ञान
51. माका उत्पादन तंत्रज्ञान
52. रबर उत्पादन तंत्रज्ञान
53. साग उत्पादन तंत्रज्ञान
54. निलगिरी उत्पादन तंत्रज्ञान
55. बांबू उत्पादन तंत्रज्ञान
56. वन एरंड (जॅट्रोफा) उत्पादन तंत्रज्ञान
57. नीम उत्पादन तंत्रज्ञान
58. मधुमका उत्पादन तंत्रज्ञान
59. जेट्रोफा उत्पादन तंत्रज्ञान
60. लसुन घास उत्पादन तंत्रज्ञान
61. ज्युट उत्पादन तंत्रज्ञान
62. कृषि प्रदर्शनाच्या आयोजनाचा अभ्यास
63. एखाद्या शहरातील कृषि सेवा केंद्रांचा अभ्यास
64. कृषि निविष्ठांचा तुलनात्मक अभ्यास
65. विद्राव्य खतांचा तुलनात्मक अभ्यास
66. रासायनिक खतांचा तुलनात्मक अभ्यास
67. किटकनाशकांचा तुलनात्मक अभ्यास
68. बुरशीनाशकांचा तुलनात्मक अभ्यास

### 1.2 आंतरविद्याशाखीय विषय

01. कोरडवाहू शेती तंत्रज्ञान
02. पीक–उत्पादनातील सिंचन पद्धतींचा अभ्यास
03. जैविक पीक–संरक्षण तंत्रज्ञान
04. वनस्पतीजन्य किडनाशकांचे उत्पादन तंत्रज्ञान
05. पीक–उत्पादनात संगणकाचा वापर
06. नियंत्रित वातावरणातील पीक–उत्पादन तंत्रज्ञान
07. तण व्यवस्थापन तंत्रज्ञान
08. बीजोत्पादन तंत्रज्ञान
09. ऊतिसंवर्धन तंत्रज्ञान
10. सेंद्रिय शेती तंत्रज्ञान
11. सेंद्रिय शेती प्रमाणीकरण तंत्रज्ञान
12. खते व पाणी व्यवस्थापन
13. मधमाशीपालन तंत्रज्ञान
14. जैविक खते उत्पादन तंत्रज्ञान
15. मृद संधारण व भूसुधार पद्धतींचा अभ्यास
16. पीक–उत्पादनात सूक्ष्म अन्नद्रव्यांचा अभ्यास
17. पीक–संजीवकांचा अभ्यास
18. कृषिवनिकी उत्पादन तंत्रज्ञान
19. वन रोपवाटिका व्यवस्थापन तंत्रज्ञान
20. मृद व जल संधारणात कृषिवनिकी पद्धतींचा अभ्यास
21. धान्य साठवणूक तंत्रज्ञान

22. कृषि-उत्पादनात प्लास्टिकल्चर तंत्रज्ञान
23. कृषिक्षेत्रात अपारंपारिक उर्जास्रोतांचा अभ्यास
24. कृषिअवजारे आणि कृषियंत्रांचा अभ्यास
25. जैविक किड नियंत्रक उत्पादन तंत्रज्ञान
26. गांढुळ खत उत्पादन तंत्रज्ञान
27. शेळी पालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
28. मेंढीपालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
29. म्हैसपालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
30. गायपालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
31. इमुपालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
32. वराहपालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
33. कुक्कुटपालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
34. ससेपालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
35. मधुमक्षिकापालन तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
36. रेशीमशेती तंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन
37. पशुव्यवसाय व्यवस्थापन
38. स्टार्च उत्पादन तंत्रज्ञान
39. दाल मिल तंत्रज्ञान
40. ऑईल मिल तंत्रज्ञान
41. तंबाखू प्रक्रिया तंत्रज्ञान
42. सुगंधी तेल निर्मिती तंत्रज्ञान
43. पशुखाद्य निर्मिती तंत्रज्ञान
44. कृषि-पुरक उद्योग - मत्स्यशेती
45. कृषि विपणन व्यवस्थापन
46. एखाद्या शहरातील कृषि उत्पन्न बाजार समितींचा अभ्यास
47. एखाद्या जिल्ह्यातील सहकारी कृषि संस्थेचा अभ्यास
48. कृषि माहिती-तंत्रज्ञान
49. कृषि सल्ला सेवा
50. कृषि-प्रदर्शन
51. कृषि निर्यात
52. कृषि-पर्यटन
53. बेकरी व्यवसाय व्यवसाथापन
54. अन्नप्रक्रिया उद्योग
55. करार शेती व्यवस्थापन
56. कंपनी शेती व्यवस्थापन
57. कृषि स्वयंरोजगार योजना
58. महिला बचत गटांचा अभ्यास
59. औषधी वनस्पतींचा अभ्यास
60. शेतकरी आत्महत्यांचा अभ्यास
61. शेतकरी कर्जबाजारीपणाचा अभ्यास
62. शेतीमधील विपरीत हवामानाचा अभ्यास
63. कृषि विभागाच्या शासकीय योजनांचा अभ्यास
64. पाणलोट क्षेत्र विकास अभ्यास
65. आदर्श गावांचा कृषि विषयक अभ्यास
66. सेंद्रिय शेती करणाऱ्या गावांची यशोगाथा
67. एकात्मिक पिक उत्पादन पद्धतींचा अभ्यास
68. कृषि विद्यापीठातील संशोधन योजनांची परिणामकारकता
69. कृषि प्रदर्शन आयोजनाचा अभ्यास

**2. उद्यानविद्या पदवी प्रकल्प सूची**

**टिप:** विषयांची यादी ही परिपूर्ण नसून आपणास त्यामध्ये बदल करून हवा तो विषय निश्चित करता येईल अथवा नवीन विषय निवडता येईल. निवडलेल्या विषयास विद्यापीठाची मान्यता घेण्याची गरज नाही.

**2.1 फळझाडांचा अभ्यास**

01. द्राक्ष उत्पादन तंत्रज्ञान
02. आंबा उत्पादन तंत्रज्ञान
03. पेरू उत्पादन तंत्रज्ञान
04. चिकू उत्पादन तंत्रज्ञान
05. नारळ उत्पादन तंत्रज्ञान
06. सुपारी उत्पादन तंत्रज्ञान
07. काजू उत्पादन तंत्रज्ञान
08. डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान
09. बोर उत्पादन तंत्रज्ञान
10. संत्रा उत्पादन तंत्रज्ञान
11. मोसंबी उत्पादन तंत्रज्ञान
12. लिंबू उत्पादन तंत्रज्ञान
13. पपई उत्पादन तंत्रज्ञान
14. केळी उत्पादन तंत्रज्ञान
15. अननस उत्पादन तंत्रज्ञान
16. कलिंगड उत्पादन तंत्रज्ञान
17. पपनस उत्पादन तंत्रज्ञान
18. अंजीर उत्पादन तंत्रज्ञान
19. फणस उत्पादन तंत्रज्ञान
20. चिंच उत्पादन तंत्रज्ञान
21. सीताफळ उत्पादन तंत्रज्ञान
22. रामफळ उत्पादन तंत्रज्ञान
23. आवळा उत्पादन तंत्रज्ञान
24. कवठ उत्पादन तंत्रज्ञान
25. जांभूळ उत्पादन तंत्रज्ञान
26. फालसा उत्पादन तंत्रज्ञान
27. कोकम उत्पादन तंत्रज्ञान
28. चारोळी उत्पादन तंत्रज्ञान
29. लिची उत्पादन तंत्रज्ञान
30. स्ट्रॉबेरी उत्पादन तंत्रज्ञान
31. पॅशनफ्रुट उत्पादन तंत्रज्ञान
32. बिब्बा उत्पादन तंत्रज्ञान
33. करवंद उत्पादन तंत्रज्ञान
34. ॲव्होकॅडो उत्पादन तंत्रज्ञान
35. फळे प्रक्रिया उद्योग

**2.2 भाजीपाला पिकांचा अभ्यास**

01. कोबी उत्पादन तंत्रज्ञान
02. फुलकोबी उत्पादन तंत्रज्ञान
03. नवलकोल उत्पादन तंत्रज्ञान
04. कोबीवर्गीय भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान
05. टोमॅटो उत्पादन तंत्रज्ञान

06. वांगी उत्पादन तंत्रज्ञान
07. भेंडी उत्पादन तंत्रज्ञान
08. बटाटा उत्पादन तंत्रज्ञान
09. काकडी उत्पादन तंत्रज्ञान
10. गरकीन उत्पादन तंत्रज्ञान
11. मिरची उत्पादन तंत्रज्ञान
12. रताळी उत्पादन तंत्रज्ञान
13. कांदा उत्पादन तंत्रज्ञान
14. गाजर उत्पादन तंत्रज्ञान
15. सुरण उत्पादन तंत्रज्ञान
16. बीटरूट उत्पादन तंत्रज्ञान
17. मुळा उत्पादन तंत्रज्ञान
18. श्रावणघेवडा उत्पादन तंत्रज्ञान
19. गवार उत्पादन तंत्रज्ञान
20. चवळी उत्पादन तंत्रज्ञान
21. वाटाणा उत्पादन तंत्रज्ञान
22. भोपळा उत्पादन तंत्रज्ञान
23. तोंडली उत्पादन तंत्रज्ञान
24. कारली उत्पादन तंत्रज्ञान
25. दोडका उत्पादन तंत्रज्ञान
26. घोसाळी उत्पादन तंत्रज्ञान
27. अळू उत्पादन तंत्रज्ञान
28. शेवगा उत्पादन तंत्रज्ञान
29. कढीपत्ता उत्पादन तंत्रज्ञान
30. करटोली उत्पादन तंत्रज्ञान
31. लेट्यूस उत्पादन तंत्रज्ञान
32. ब्रोकोली उत्पादन तंत्रज्ञान
33. आळिंबी उत्पादन तंत्रज्ञान
34. पालेभाज्या उत्पादन तंत्रज्ञान
35. भाजीपाला प्रक्रिया उद्योग

**2.3 फुलझाडांचा अभ्यास**

01. गुलाब उत्पादन तंत्रज्ञान
02. शेवंती उत्पादन तंत्रज्ञान
03. झेंडू उत्पादन तंत्रज्ञान
04. अॅस्टर उत्पादन तंत्रज्ञान
05. गेलार्डिया उत्पादन तंत्रज्ञान
06. निशीगंधा उत्पादन तंत्रज्ञान
07. ग्लॅडिओलस उत्पादन तंत्रज्ञान
08. लिली उत्पादन तंत्रज्ञान
09. झिनिया उत्पादन तंत्रज्ञान
10. कार्नेशन उत्पादन तंत्रज्ञान
11. डेलिया उत्पादन तंत्रज्ञान
12. जस्मीन (जाई, जुई, मोगरा) उत्पादन तंत्रज्ञान
13. कर्दळी उत्पादन तंत्रज्ञान
14. बोगनवेल उत्पादन तंत्रज्ञान
15. जरबेरा उत्पादन तंत्रज्ञान
16. ऑर्किड उत्पादन तंत्रज्ञान
17. हंगामी फुलझाडांचे उत्पादन
18. बोन्साय व्यवस्थापन
19. जोजोबा उत्पादन तंत्रज्ञान
20. स्टिव्हीया उत्पादन तंत्रज्ञान
21. फुले प्रक्रिया उद्योग
22. शुष्क फुले (Dry flowers) उद्योग

**2.4 मसालावर्गीय पिके व औषधी वनस्पतींचा अभ्यास**

01. हळद उत्पादन तंत्रज्ञान
02. आले उत्पादन तंत्रज्ञान
03. लवंग उत्पादन तंत्रज्ञान
04. मिरी उत्पादन तंत्रज्ञान
05. लसूण उत्पादन तंत्रज्ञान
06. वेलदोडा उत्पादन तंत्रज्ञान
07. जायफळ उत्पादन तंत्रज्ञान
08. पानवेल उत्पादन तंत्रज्ञान
09. कॉफी उत्पादन तंत्रज्ञान
10. शतावरी उत्पादन तंत्रज्ञान
11. सफेद मुसळी उत्पादन तंत्रज्ञान
12. अश्वगंधा उत्पादन तंत्रज्ञान
13. इसबगोल उत्पादन तंत्रज्ञान
14. गुगुळ उत्पादन तंत्रज्ञान
15. रानवांगी उत्पादन तंत्रज्ञान
16. रिठा उत्पादन तंत्रज्ञान
17. पानमळा व्यवस्थापनाचा अभ्यास
18. औषधी वनस्पती उत्पादन तंत्रज्ञान

**2.5 प्रांगणउद्यान अभ्यास**

01. एखाद्या शहरातील उद्यानांचे व्यवस्थापन
02. एखाद्या शहरातील उद्यानांचा अभ्यास
03. पब्लिक गार्डनची आखणी आणि रचना
04. एखाद्या शहरातील वृक्षराजीचा अभ्यास
05. एखाद्या शहरातील परसबागांचा अभ्यास
06. एखाद्या शहरातील टेरेस गार्डनचा अभ्यास
07. आधुनिक पुष्परचना अभ्यास
08. एखाद्या शहरातील लॉनचा (हिरवळींचा) अभ्यास
09. एखाद्या शहरातील लतावेलींचा अभ्यास
10. एखाद्या शहरातील गृहनिर्माण सोसायटींच्या बागेचे नियोजन आखणी आणि उभारणी
11. शोभिवंत वनस्पतींचा अभ्यास
12. एखाद्या शहरातील रोपवाटिकांचा अभ्यास
13. औद्योगिक वसाहतीमधील बागांचा अभ्यास
14. औद्योगिक वसाहतीमधील उद्यानांचा अभ्यास
15. एखाद्या शहरातील रोपवाटिकांचा अभ्यास
16. एखाद्या शहराभोवतालच्या फार्महाऊसेसचा अभ्यास
17. हॉटेल इंडस्ट्रीजमधील प्रांगणउद्यानांचा अभ्यास

**2.6 व्यवस्थापन, प्रक्रिया, विपणन अभ्यास**

01. आधुनिक रोपवाटीका अभ्यास
02. थेट शेतमाल विक्री व्यवस्थेचा अभ्यास
03. शेड नेट मधील भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान

04. नियंत्रित आधुनिक सिंचन प्रणालींचा अभ्यास
05. एखाद्या पिकाच्या निर्यातीचा अभ्यास
06. रोपवाटीका व्यवस्थापन
07. उती संवर्धन तंत्रज्ञान
08. कोरडवाहू फळबागांचे व्यवस्थापन
09. एखाद्या जिल्ह्यातील फळबागा विकास योजनेचा अभ्यास
10. पॉलिहाऊसमधील भाजीपाला उत्पादन
11. भाजीपाला निर्जलीकरण तंत्रज्ञान
12. हळदप्रक्रिया तंत्रज्ञान
13. आलेप्रक्रिया तंत्रज्ञान
14. कांदा प्रक्रिया तंत्रज्ञान
15. लसूणप्रक्रिया तंत्रज्ञान
16. फळे, भाजीपाला-प्रक्रिया तंत्रज्ञान
17. फळे, भाजीपाला, फुले प्रक्रिया तंत्रज्ञान
18. बेदाणा उत्पादन तंत्रज्ञान
19. वाईन उत्पादन तंत्रज्ञान
20. एखाद्या शहरातील फळे, भाजीपाला प्रक्रिया उद्योगांचा अभ्यास
21. एखाद्या शहरातील फळे, भाजीपाला आणि फुलांची हाताळणी आणि व्यापार पद्धती
22. एखाद्या शहरातील फ्लोरिस्ट शॉपचा अभ्यास
23. फळे, भाजीपाला आणि फुलांच्या निर्यातीतील समस्या आणि वाव
24. एखाद्या शहरातील कृषि उत्पन्न बाजारसमितीमार्फत होणाऱ्या फळे, भाजीपाला आणि फुलांच्या व्यापाराचा अभ्यास

**2.7 इतर विषय**

01. मातीविना शेती (हायड्रोपॉनिक्स) उत्पादन तंत्रज्ञान
02. शहरी शेती उत्पादन तंत्रज्ञान
03. टेरेस गार्डन तंत्रज्ञान
04. ग्लोबल गॅप प्रमाणिकरणाचा अभ्यास
05. प्रक्रिया उद्योगामधील प्रमाणिकरण प्रणालींचा अभ्यास
06. वनस्पतीजन्य किडनाशकांचे उत्पादन तंत्रज्ञान
07. किड सर्व्हेक्षण (क्रॉपसॅप) योजनांचा अभ्यास
08. औषधी व सुगंधी वनस्पती रोपवाटीका तंत्रज्ञान
09. फळ पिकांमधील वळण व छाटणी पद्धतींचा अभ्यास
10. उद्यानविद्या पिकांमधील संजिवकांचा अभ्यास
11. उद्यानविद्या पिकांमधील खास पद्धतींचा अभ्यास
12. कृषि प्रदर्शन आयोजनाचा अभ्यास
13. एखाद्या शहरातील कृषि सेवा केंद्रांचा अभ्यास
14. कृषि निविष्ठांचा तुलनात्मक अभ्यास
15. विद्राव्य खतांचा तुलनात्मक अभ्यास
16. रासायनिक खतांचा तुलनात्मक अभ्यास
17. किटकनाशकांचा तुलनात्मक अभ्यास
18. बुरशीनाशकांचा तुलनात्मक अभ्यास